Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# ज्योत्स्ना देवधर यांचे मराठी साहित्यातील वाङ्मयीन योगदान

**रेश्मा पुरुषोत्तम वेखंडे (झाडे)**
संशोधक विद्यार्थिनी

**प्रा. डॉ. राकेश देवरावजी कभे**
संशोधक मार्गदर्शक

---

**प्रस्तावना :**

कोणत्याही साहित्यकृतीवर त्या त्या कालखंडातील समाज व संस्कृतीचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रभाव पडलेला दिसून येतो. मानवी समाज जीवनातील बदलती नीती मूल्ये, रुढी, परंपरा आणि यातून घडणारे बदल यांचा परिणाम साहित्यावर दिसून येतो. १९६० नंतरच्या काळात अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. याच कालावधीत स्त्रीवादी साहित्य लेखनास सुरुवात झाली. शिक्षणाच्या प्रसार झाल्यामुळे स्त्रियांच्या साहित्य लेखनाच्या परंपरेला चालना मिळाली. यातून स्त्रियांना समाजात असलेले दुय्यम स्थान, शोषण याची जाणीव व यातून स्त्रीवादी लेखन व्हायला सुरुवात झाली. माणसाच्या जगण्यातील वासना, विकृती याचा परामर्श लेखनातून होऊ लागला. वास्तवाचा अंगीकार होऊन जागृती होऊ लागली.

ज्योत्सना देवधर याच काळातील एक प्रतिभावंत लेखिका होय. ज्योत्सनाताईंचा जन्म हा राजस्थानातील असल्यामुळे तेथील स्त्रियांचे बंदिस्त जीवन त्यांनी जवळून पाहिले आहे. त्यामुळे त्यांच्या लिखाणातून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य झाले. हिंदी मराठी कथा, कादंबरी लिखाणातून त्यांनी बालविवाह, शोषण, बलात्कार, वृद्धांची हेळ सांड या समस्या वाचकासमोर आणल्या. स्त्रियांनी आपल्या अधिकार अस्तित्वासाठी लढा द्यावा यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. समाजात घडवून येणारे बदल ज्योत्स्ना देवधर यांच्या कथा, कादंबरी लिखाणातून आपणास दिसून येते. समकालीन परिस्थितीचे योग्य भान ठेवून ज्योत्स्नाताईंनी लेखन केलेले आहे. 'अनुभवाची ही सर्व श्रीमंती प्रतिभावंत ज्योत्स्ना देवधर यांनी साहित्य निर्मिती करताना कौशल्याने उपयोगात आणली. स्त्री व तिच्या समस्या, स्त्रीच्या सुखदु:खाची नानाविध कारणे व त्याचे परिणाम हे स्वाभाविकपणे त्यांच्या साहित्य निर्मितीचे केंद्र होत गेले. व्यक्तिगत पातळीवर त्यांची अशी वाढ होत असताना, बा. भ. बोरकर, गोपीनाथ तळवलकर, सोपानदेव चौधरी, श्री. बा. रानडे, माधवराव गोळवलकर, सई परांजपे, व्यंकटेश माडगूळकर प्रभूतींचा सहवास त्यांच्या साहित्य निर्मितीला व साहित्य विषयक विचारांच्या जडणघडणीला सहाय्यभूत ठरला.

**स्त्रीवादी भूमिका :**

ज्योत्स्ना देवधर यांनी कथा, कादंबरी लेखन विपुल प्रमाणात केले आहे. त्यांचे लेखन स्त्रीवादी भूमिकेतून झालेले दिसून येते. ज्योत्स्नाताईंनी ‘स्त्रीवाद’ स्वतंत्र विषय हाताळला नसून कथा, कादंबरीच्या आशयातून त्यांनी उलगडून दाखविला आहे. स्त्री जीवनातील घुसमट त्यांनी त्यांच्या लिखाणातून वाचकांसमोर मांडलेली आहे. ज्योत्सना देवधर यांच्या कथा कादंबऱ्या सामाजिक असून स्त्री केंद्री आहेत. ज्या काळात स्त्रीत्वाची उपेक्षा केली जात होती, अशा काळात त्यांनी प्रतिनिधित्व केले आहे. स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर काळातील पुरुष प्रधान

संस्कृतीत होणारी स्त्रियांची घुसमट, एकत्र कुटुंबातील ताणतणाव, शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे नोकरीसाठी घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांची होणारी घालमेल, संघर्ष, मानसिक तणाव असे विविध प्रश्न त्यांनी त्यांच्या लिखाणातून हाताळले आहे. कथा, कादंबरीतील नायिका स्त्रीवादी दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या दिसून येतात.

अरुणा सबाने स्त्रीवादाविषयी म्हणतात. 'स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि निर्णयाची अवहेलना होऊ नये, समाजामध्ये स्त्रियांना कायदेशीर समानतेचे स्थान असते. स्त्रीवाद स्वतःबद्दल प्रत्येक स्त्रीला बोलायला शिकवतो तो स्त्रीला तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देतो आणि त्याविरुद्ध संघर्ष करायला प्रेरणा देतो. 'स्त्रीवाद' म्हणजे स्त्रियांच्या अंतर्मनात दबलेल्या उर्मींना फोडणे आहे.'

ज्योत्स्ना देवधर यांनी कथा, कादंबरी रंगवताना त्यात अपेक्षित वातावरण, कालखंड, सामाजिक भान यामध्ये कधीही विसंगतपणा आणलेला जाणवत नाही. त्यातील घटना पात्र आपल्याला जिवंत वाटते. हे सगळे कुठेतरी आपल्यापैकी आहे अशी भावना वाचकाला येते, ज्योत्स्ना देवधरांच्या 'घर गंगेच्या काठी' (१९६७), 'कल्याणी (१९६८) या कादंबऱ्यातील नायिका पुरुषप्रधान संस्कृतीत दडपलेल्या अन्यायाला वाचा फोडून परिस्थितीशी संघर्ष करून समोर जाणारी खंबीर स्त्री रेखाटली आहे. ज्योत्स्नाताईच्या कादंबऱ्याविषयी डॉ. स्वाती कर्वे म्हणतात, 'ज्योत्स्ना देवधरांनी स्त्रीवादी जाणिवेतून या दोन्ही नायिका घडवलेल्या नाहीत, परंतु कौटुंबिक पातळीवर कुटुंबावर प्रेम करणारी तरीही आत्मसन्मानाची अधिकाराची मागणी करणारी नायिका त्यांनी उभी केली. शिक्षण व नोकरी यासाठी घराबाहेर न पडता ही घराच्या चौकटीत राहणारी स्त्री सुद्धा बदलत होती, स्त्रीच्या बदलणाऱ्या व्यक्तीमत्त्वाला ज्योत्स्नाताईंनी या दोन लघु कादंबऱ्यातून साधारण पंचवीस वर्षांपूर्वीच उभी केली आहे.'

‘रमाबाई’ ही ज्योत्स्ना देवधर यांची चरित्रात्मक कादंबरी आहे. या कादंबरीत रमाबाईचा भाऊ श्रीनिवास संध्या करताना पाहून रमाला पण संध्या पाठ होते. रमा हे कानी पडलेले मंत्र म्हणू लागते. तेव्हा तिचे वडील रमाला मंत्र म्हणण्यास नकार देतात. हा मंत्र स्त्रियांनी म्हणणे पाप होय असे म्हणतात. हे एकूण रमाला राग येतो व ती प्रत्युत्तर देते, पुरुषांचे कान आणि बायकांचे कान निराळे असतात?", दादा मुलगा म्हणून त्याने काहीही करावं. मी ताईन मुलीची जात म्हणून सारखं पाटाखालचं मांजर बनून राहावं, का म्हणून?"

या वाक्यातून रमाबाईचा स्व हक्कासाठी लढा माणूस म्हणून जगण्याची जिद्द हे दिसून येते. 'माणूस म्हणून स्वतंत्रपणे विचार करता आलं पाहिजे. जे बुद्धीला पटणार नाही ते स्वीकारता कामा नये, ताई बाईमाणूस म्हणजे मुकं जनावर नाही. पुरुषांप्रमाणे तिलाही माणूस म्हणून जगता आलं पाहिजे.' वरील वाक्य मधून रमा नायिकेची स्त्रीवादी भूमिका स्पष्ट होते.

अशा प्रकारे स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळावे. स्त्री पुरुष समानता ही प्रवृत्ती समाजामध्ये रुजावी या अनुषंगाने त्यांच्या कथा कादंबरीतील नायिका कमी अधिक प्रमाणात स्त्रीवादी जाणिवेतून आपल्याला अनुभवास येते.

**समाजाभिमुखता :**

समाज हा व्यक्ती जीवनाचा एक अविभाज्य अंग आहे. व्यक्तीची संस्कृतीमुळे ही समाजातच रुजलेली असतात यातून त्याचे व्यक्तिमत्व विकसित होते ज्योत्स्ना देवधर यांनी सुद्धा या समाजातील एक घटक म्हणून कथा, कादंबरी लेखन केले आहे. त्यांची साहित्य निर्मिती समाजासापेक्ष आहे. समाजात स्त्रियांना मिळणारी वागणूक, तिची होणारी कुचंबणा, अवहेलना, मुला मुलींमध्ये आढळून येणारा भेद, मुलगा म्हणजे वंशाचा दिवा मुलगी म्हणजे परक्याचे धन हे सर्व त्यांनी लहानपणापासून बघितलेले आहे. आकाशवाणीच्या नोकरी दरम्यान विविध समस्यांनी ग्रासलेल्या स्त्रिया, हक्कापासून वंचित असलेल्या स्त्रियांचे अनुभव त्यांनी जाणले हा अनुभव त्यांच्या साहित्य निर्मितीची प्रेरणा ठरल्याचे दिसून येते.

पारंपारिक कुटुंब व्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृती संघर्षाने तोंड देणाऱ्या स्त्रिया ‘घर गंगेच्या काठी’ व 'कल्याणी' कादंबरीतून दिसून येते. लेखिका स्वतः एक स्त्री असल्याने स्त्रियांचे प्रश्न, त्यांची मानसिकता याचे सूक्ष्म विश्लेषण त्यांनी केल्याचे दिसून येते. पुरुष अहंकाराने प्रभावित स्त्रिया ‘कडेलोट’, 'वाळूचे फूल', 'आंधळी कोशिंबीर',' बुटक्या सावल्या', ‘पडझड’, 'पुतळा' इत्यादी कादंबरीत मिळते. त्याचप्रमाणे त्यांच्या कथासंग्रहातून स्त्रियांचे वेगळे वेगळे व्यक्तिमत्व आपल्याला पहावयास मिळते 'समास' मधील सर्व कष्ट सहन करणारी शुभदा, याच कथेत स्वतःचे अस्तित्व जपणारी मानसी, अनिता एक नकोशी असणारी मुलगी असे स्वरूप पहावयास मिळते. ‘अपूर्वा’ या कथेतून भिन्न व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रिया, ‘मैत्रीण’ मधील सुप्रिया आणि मंजू, या दोन व्यक्तिमत्त्वाची टोके, दोन विरुद्ध बाजू प्रस्थापित होताना दिसून येते. त्याचप्रमाणे 'उद्ध्वस्त', ‘सात घराच्या सीमारेषा’, 'सुखाचा शोध' यातून वेगवेगळ्या स्त्रिया यांचे संघर्ष हे दिसून येतात. कुँवरनी' आणि चुकामुक' या कादंबरीतून लेखिकेने नवीन विषय सुद्धा हाताळले आहे. स्त्रियांसोबतच त्यांनी पुरुषांच्या भावविश्वाचाही भेद घेतला आहे. याचे दर्शन ज्योत्स्ना देवधर यांच्या 'आक्रीत', अट', ‘बुटक्या सावल्या’ या कादंबरीतून दिसून येते, बाहेरगावी शिकण्यासाठी मुलगी गेल्यावर तिला सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने आई मुलीचा मैत्रीपूर्ण पत्रात्मक संवाद लेखिकेने ‘हो नाही च्या उंबरठ्यावर’ या कादंबरीत रेखाटला आहे.

समाजात असणाऱ्या विविध प्रकारच्या, विविध पातळीवरच्या, विविध क्षेत्रातील भिन्न काळातील कथा, कादंबऱ्यातून साकारलेला समाज वेगवेगळा असला तरी समाज प्रवृत्तीचे वास्तविकपण कायम दिसून येते. बदलत्या काळानुसार आचार विचार बदलले तरी त्या जीवनाच्या मूळ प्रवृत्ती प्रभावित झालेली असतात. समाजातील चालीरीती, रुढी, परंपरा बदलते जीवन शोधण्यासाठी नवीन प्रवृत्ती निर्माण झालेली असतात. मानवी मनाच्या सामाजिक संबंधाचा शोध समाजातून घेतला जात असतो. ज्योत्सना ताईंच्या कथा, कादंबऱ्या म्हणूनच समाजभिमुख झालेल्या दिसून येतात. ज्योत्स्ना देवधरांनी स्त्री जीवन विषयक प्रश्न सोबतच सामाजिक इतर घटकाचे प्रश्न, समाजाचे वास्तव वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**स्त्री जीवनातील प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्नः**

ज्योत्स्नाताईं आकाशवाणीच्या नोकरीच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्त्रियांच्या संपर्कात येत होत्या. घराघरातून आकाशवाणी वरची 'गृहिणी' सर्वांना जवळची वाटू लागली होती. गृहिणीच्या निमित्ताने त्यांना

‘मायेची वहिनी’ मिळाली होती. समाजातील विधवा, परितक्त्या, वेश्या, देवदासी अशा विविध स्त्रियांशी त्यांचा संपर्क येत होता यातून त्यांच्या जीवनातील समस्या ज्योत्स्ना ताईचे मन हेलावून टाकत असत. सोबतच पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांची होणारी कुचंबना, तिला मिळालेला दुय्यम दर्जा, एकत्र कुटुंबातील स्त्रियांची मानसिकता, दुभंगलेले सहजीवन या अशा प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न त्यांनी त्यांच्या कथा, कादंबरीतून केलेला दिसून येतो. पुरुष केंद्रीय कुटुंब व्यवस्थेत नवऱ्याचा स्वभाव, अहंकारी वृत्ती, मुलांवर होणारे परिणाम, घरातील वातावरण या सर्व परिस्थितीत शांतपणे सहन करणाऱ्या स्त्री जीवनाचे चित्रण 'कडेलोट', वाळूचे फूल, 'पुतळा', 'बुटक्या सावल्या' इत्यादी कादंबऱ्यातून केले आहे. यात पुरुषी अहंकाराखाली दडपलेल्या स्त्रियांचे जीवन दिसून येते. पुरुषी वर्चस्वाचे वेगळेपण, वेगवेगळे रूप लेखिकेने दाखविले आहे. डॉ. स्वाती कर्वे म्हणतात," प्रौढ वयातील स्त्रीचे काळवंडणारे भाव विश्व संसाराविषयी तिला घेरणारी उदासीनता, दोन पिढ्यांमध्ये पडणारे अंतर बघून येणारी निराशा हा ज्योत्स्नाताईंच्या चिंतनाचा महत्त्वाचा विषय आहे, जो विवक्षित संक्रमण काळ ज्योत्स्नाबाईंच्या लेखनाचा मुख्य प्रेरणास्त्रोत आहे. त्या काळातून त्या स्वतःही जात होत्या. स्त्री म्हणून सहन करीत होत्या, त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांची सावली सुद्धा त्यांच्या लेखनातून वारंवार दिसून येते.'

शिक्षण नोकरी करीत असताना कुटुंबात असमाधान प्राप्त झालेल्या व त्या असमाधान या प्रश्नांवरही समाधान प्राप्त करणाऱ्या मार्ग शोधणाऱ्या नायिका ‘एक श्वास आणखी', 'उणेएक' या कादंबऱ्यात पाहायला मिळते. त्याचप्रमाणे 'बोच','झरोका’, 'सायली’, ‘मधली भिंत’ या कथांमधून त्यांनी स्त्री संघर्ष चित्रित केलेला दिसून येतो. अशाप्रकारे एकूण स्त्रियांच्या जीवनातील निर्माण होणाऱ्या समस्यांना वाचा फोडण्याच्या दृष्टिकोनातून लेखिकेने लेखन केलेले आढळून येते.

**लेखिकेची सामाजिक जाणीवः**

ज्योत्स्ना देवधर यांच्या कथा, कादंबरी लिखाणाची सुरुवात १९६० नंतर झाली. स्त्री जीवनाचा तो काळ स्थित्यंतराचा व परिवर्तनाचा होता. एक स्त्री म्हणून स्वतः ज्योत्स्नाताईनी हा काळ अनुभवला होता, त्यामुळे स्त्री जीवनातील विविध प्रश्नांची त्यांना जाण होती.

समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, परंपरागत मूल्य व्यवस्था यातून स्त्रियांची होणारी कुचंबणा याला कंटाळून कुटुंबाची चौकट झुगारून देण्याचे विचार, स्त्री म्हणून कुटुंब, समाज त्यांच्या अपेक्षा पूर्तता करणे हे कर्तव्य समजणाऱ्या समाजाचे विचार या भावनेने कोलमडून गेलेली स्त्री, तरीही कुठेतरी विद्रोहाची भावना ठेवून उभी राहणारी स्त्री त्यांनी आपल्या लिखाणातून साकारली आहे. 'घर गंगेच्या काठी' मधील जानकीचा संघर्ष, पडझड' मधील मृणालचा घर सावरण्याचा प्रयत्न करताना तिची होणारी मानसिक अवस्था अशा प्रकारच्या लिखाणातून स्त्रियांचे प्रश्न समस्या त्यांची मानसिक अवस्था यातून येणारा एकटेपणा लेखिकेने आपल्या कथा, कादंबरीतून साकारला आहे.

ज्योत्स्ना देवधर यांनी स्त्री समस्या बरोबर पुरुषांच्या भाव विश्वाचा ही वेध घेतला आहे. पुरुष म्हणून अहंकाराने वागतो, घरात वावरताना तो समाजात त्याला जो मानसन्मान मिळतो, तोच सन्मान घरातील प्रत्येकाने द्यावा अशी अपेक्षा करतो परंतु कालांतराने जेव्हा सत्ता कमी होते, तो दुर्बल होतो तेव्हा त्याला त्याच्या वागण्याचा

पश्चाताप होतो. अशा पुरुषांचे चित्रण त्यांनी केले आहे. या सर्वांसोबतच अनाथ मुलं, त्याला समाजात मिळणारी तुच्छ वागणूक, त्याची होणारी पिळवणूक, पोटासाठी करावा लागणारा संघर्ष त्यांनी 'चुकामुक' या कादंबरीत रेखाटला आहे.

अशाप्रकारे साहित्य आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू हे लेखिकेने सार्थ करून दाखविले आहे. समाजाचा घटक व स्वतः एक स्त्री म्हणून स्त्रियांच्या विविध प्रश्नांना त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी सामाजिक जाणिवेचे भान ठेवून आपल्या कथा, कादंबरीतून केलेला दिसून येतो.

‘वारू, वाळवी लागलेल्या घरावर दुसरा मजला
चढवू नये, सगळचं कोसळतं.’ (सात घराच्या सीमारेषा)

'किती किती आठवणी मनाला डिंक डांबरासारख्या
चिकटून बसल्यात'. (घुम्मस)

‘सुखाचं आकाश तिच्या बंगल्यातून केव्हाच बाहेर पडलं
होतं आणि दुःखाचे ढग येऊन बरसले होते’. (सायली)

'पण पाणी कितीही उकळावं तरी त्यावर साय
धरत नाही. ' (मिसफिट)

**संदर्भग्रंथ :**


- देवधर ज्योत्स्ना, ‘शिंपण', नवचैतन्य प्रकाशन मुंबई, ऑ. २०१२. पृ.६.
- संपा. सबाने अरुणा, ‘स्त्रीवाद एक दृष्टिक्षेप’, आकांक्षा प्रकाशन, पृ.२२ बजाज नगर नागपूर प्र. आ. १७ ऑक्टो. २००९
- डॉ. कर्वे स्वाती, 'लघु कादंबरीचे साहित्य स्वरूप', पृ.३९०ते३९१. (मराठी लघु कादंबरीः संकल्पना व स्वरूप व इतिहास) प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे प्र. आ. ऑक्टो. २९११
- देवधर ज्योत्स्ना, ‘शिंपण', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई. ऑ. २०१२. पृ.९४
- देवधर ज्योत्स्ना, 'रमाबाई’, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.प्र.आ.१९८३. पृ.७
- तत्रैव : पृ.१३
- संपा. ढेरे अरुणा, ‘स्त्रीलिखीत मराठी कादंबरी (१९५० ते २०१९)’, पृ.७५ पद्मगंधा प्रकाशन सदाशिव पेठ मुंबई प्र.आ.२०१३
- ज्योत्स्ना देवधर, ‘शिपंण’, नवचैतन्य प्रकाशन मुंबई, ऑफ. २०१२, पृ. ५५
- तत्रैव : पृ.५६